**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय**

मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पूर्व) 400 603.
फोन : 022-25329865/ 25329642, फॅक्स 022-25329912.
Email: ccftthane@mahaforest.gov.in / ccfthane@gmail.com
Website: www.mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग

ISO 9001:2008
Certified by IRQS

MGMT. SYS.
RvA C 071

विषय : एकरेषिय (Linear) प्रकल्पांबाबत झाडे तोडण्यास व
कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याबाबत.
**मुंबई पोरबंदर प्रकल्प (MTHL) अंतर्गत समाविष्ट होणारे ४७.४१७ हेक्टर वनजमिन वळतेकरण प्रस्ताव.**

जा.क्र. कक्ष-१०/वसं/प्र.क्र.१४(२)/१२-१३/जा.क्र.१६९/१७-१८
ठाणे - ४००६०३, दिनांक - २२/०५/२०१७

वाचा:-

1) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं.८-८९/२०१३/FC, दिनांक २२.०१.२०१६
२) मुख्य वनसंरक्षक,(प्रा.) ठाणे यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१०/वस/प्र.क्र.१४(अ)/१२०५ दि. २७.३.२०१७.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१७/NC-II/ID-१२१८१(५०)/२६६, दिनांक ०२.०५.२०१७.
४) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-११-३०६/२०१४/एफसी, दि. ८.८.२०१४.
५) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-१-३०६/२०१४/एफसी, दि. १५.१.२०१५.
६) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं.११/३०६/२०१४, दि. ७.५.२०१५.
७) शासन परिपत्रक क्र.एफएलडी-२०१५/प्र.क्र.७७/फ-१०, दि.१.७.२०१५.

आदेश -

ज्याअर्थी, राज्य शासनाचे महसुल व वनविभागाकडून कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रोड, शिवडी-न्हावा, सागरी सेतु (MTHL) करीता ४७.४१७ हेक्टर वनजमिन वळतेकरण प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला होता.

आणि ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला वळतेकरण प्रस्ताव, भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (Site Specific) आहे.

आणि ज्याअर्थी, उपवनसंरक्षक अलिबाग, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर आणि महाराष्ट्र शासनाने या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर वन

(संवर्धन) अधिनियम १९८० च्या तरतुदीनुसार ४७.४१७ हेक्टर वनजमिन वळते करण्याची केंद्रशासनास शिफारस केली आहे.

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर विचार करुन, राज्य शासनाने सादर केलेल्या प्रस्तावास अ.क्र.१ अन्वये काही अटीं शर्थीच्या अधिन राहून तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावातंर्गत वनजमिनीच्या बदल्यात प्रकल्प यंत्रणेने पर्यायी वनेत्तर क्षेत्र मौजे मोर्बे ता. पनवेल येथील सर्व्हे क्र.२४२ चे १० हेक्टर, मौजे वाजंळे, ता.श्रीवर्धन, सर्व्हे क्र.८६ चे ११.०२ हेक्टर, मौजे रानवली, ता. श्रीवर्धन, सर्व्हे क्र.१८७ चे १४.७१३३ हेक्टर आणि मौजे दुरटोली, सर्व्हे क्र.१५२ चे ११.६८३७ हेक्टर असे एकूण ४७.४१७ हेक्टर क्षेत्र उपलब्ध करुन दिले आहे. सदर क्षेत्राचे वन विभागाकडे हस्तांतरण(Transfer) व वन विभागाच्या नावाने (Mutation) झालेले आहे. सदर क्षेत्रातील मौजे मोर्बे येथील सर्व्हे क्र.२४२ चे १०.०० हेक्टर क्षेत्रापैकी ०८.०० हेक्टर क्षेत्र लागवडी अयोग्य व दाट जंगल असल्यामुळे, तेथे २ हेक्टर क्षेत्रावर लागवड करुन उर्वरीत ८ हेक्टर क्षेत्राच्या बदल्यात अलिबाग वन विभागातील मौजे पराडे सर्व्हे क्र.४१/१ चे ०८.०० हेक्टर अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण प्रस्तावित केले आहे.

आणि ज्याअर्थी, पर्यायी वनीकरणाकरिता रक्कम रु.२,१४,०३,३२३/-, नक्त वर्तमान मुल्यांकरिता रक्कम रु.४,४५,२४,५६३/-, पक्ष्यांचा अधिवास म्हणून कृत्रिम घरटी करणे व मृद व जलसंधारणाच्या कामासाठी रक्कम रु.६२,५०,०००/- एवढी रक्कम प्रकल्प यंत्रणेने Adhoc Campa कडे वर्ग केली आहे. तसेच २००.०० हेक्टर पर्यायी कांदळवन क्षेत्र लागवड करण्याकरिता प्रकल्प यंत्रणेने कांदळवन कक्षाकडे रक्कम रु.४९,५९,०००/- आणि रु.४,५६,२९,६००/- अशी एकूण ५,०५,८८,६००/- एवढी रक्कम कांदळवन कक्षाकडे हस्तांतरीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचीका क्र.८७/२००६ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने कांदळवन क्षेत्राच्या संबंधात प्रकल्प यंत्रणेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या नोटीस ऑफ मोशन क्र.३०७/२०१६ मध्ये मा. न्यायालयाने दि.२८.११.२०१६ रोजी निर्णय पारित करुन परवानगी दिली आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावांतर्गत असलेले वनक्षेत्र कर्नाळापक्षी अभयारण्याचे संरक्षित क्षेत्राच्या बाहेर असल्यामुळे मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या परवानगीची आवश्यकता नाही.

आणि ज्याअर्थी, Mitigation measures बाबत BNHS यांनी केलेल्या शिफारशी व राज्य वन्यजीव मंडळाने केलेल्या सुधारणा या प्रकल्प यंत्रणेने स्वताचे खर्चाने राबविणेचे आहेत. प्रकरणी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी कांदळवन व समुद्र जीवांच्या संवर्धनाकरिता (Mangroves and Marine Biodiversity Conservation Plan) साठीची प्रस्तावित रक्कम रु.८६.३१ कोटी एवढी रक्कम प्रकल्प यंत्रणेने कांदळवन कक्षाकडे हस्तांतरीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, तसेच Mitigation measures साठी BNHS संस्थेने कळविले नुसार आधीची रक्कम रु.३३.०० कोटी अथवा याबाबतीत BNHS यासाठी पुर्नप्रस्ताव करीत असल्याने त्यानुार जी रक्कम होईल ती रक्कम प्रकल्प यंत्रणेने शासनाकडे हस्तांतरीत करावी, व त्यानंतर शासनाकडून दरवर्षी आवश्यक ती रक्कम BNHS संस्थेस वर्ग करण्यांत येईल. या अटींच्या अधिन प्रकल्प यंत्रणा राहील.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, रायगड व मुंबई शहर यांनी वनहक्क कायदा, २००६ प्रमाणपत्र जारी केलेले आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक/ पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाकडून प्राप्त तत्वत: मान्यता पत्रातील अटी/शर्तीचा पुर्तता अहवाल उप वनसंरक्षक, अलिबाग यांजकडुन प्राप्त झालेनंतर मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांनी उपरोक्त अ.क्र.२ चे पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे सादर करण्यांत आला. त्यांनतर त्यांचेकडिल उपरोक्त अ.क्र.३ चे पत्रान्वये शासनास अहवाल सादर करणेंत आला आहे.

आणि त्याअर्थी, प्रस्तावांतर्गत समाविष्ट संरक्षित, खाजगी व कांदळवनाचे ४७.४१७ हेक्टर क्षेत्रातील झाडे तोडणे व कामे सुरु करण्यासाठी परवानगी देण्याची बाब विचारात घेण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, वरील अ.क्र. ४ व ५ अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेले आहेत. तसेच केंद्रशासनाने वरील अ.क्र. ६ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन लाईन, पाण्याची पाईप लाईन, ऑप्टीकल फायबर केबल लाईन, रेल्वे लाईन इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाचे वरील अ.क्र. ७ चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

म्हणून आता याव्दारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रोड, शिवडी-न्हावा, सागरी सेतु (MTHL) करीता ४७.४१७ हेक्टर वनजमिन वळतेकरण प्रस्ताव, खाली दिलेल्या अनुसूची मध्ये नमूद केलेली आणि उप वनसंरक्षक, अलिबाग व ठाणे यांनी सादर केलेले प्रकल्प प्रस्तावातील तपशिलात नमूद केलेली ४७.४१७ हेक्टर वळतेकरण क्षेत्रात झाडे तोडण्यास व कामे सुरु करण्यास परवानगी देत आहे. ही परवानगी केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या उपरोक्त संदर्भित पत्रातील अटी/शर्तीच्या पूर्ततेच्या अधिन राहून तसेच खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे:-

१) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात कामे करण्यापुरती मर्यादित आहे.

२) प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत विधीवत मान्यता मिळालेल्या पत्रातील अटींची पुर्तता तात्काळ होईल याबाबत दक्षता घ्यावी. विधीवत मान्यता मिळालेल्या दिनांका पासून ६ महिन्याच्या आत प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालन करेल याची उप वनसंरक्षक अलिबाग हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांना सादर करतील.

३) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत वनजमिनीवर काम सुरु करण्यापूर्वी, सबंधित उप वनसंरक्षक यांना कळविणे आवश्यक आहे. सबंधित उप वनसंरक्षक यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित वन जमीनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे. तसेच वनभंग झाला असल्यास, प्रचलित कायद्यानुसार कारवाई करावी.

४) सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून विधीवत मान्यता आणि राज्य शासनाकडून औपचारिक वनक्षेत्र वळते करण्याचे आदेश अप्राप्त आहेत. सदर आदेश / मान्यता देताना घालून दिलेल्या अटीं / शर्ती प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

५) प्रकल्प यंत्रणेकडून कामे करतांना जे कांदळवन वृक्ष काढावे लागणार आहेत, त्यांना कमीत कमी हानी पोहोचेल ही बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

६) प्रकल्पांतर्गत वृक्षतोड करणेकामी महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ अंतर्गत संबंधित वृक्षधिकारी तथा वनक्षेत्रपाल यांनी वृक्षतोडीची परवानगी जारी करणे आवश्यक आहे.

७) मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचीका क्र.८७/२००६ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने कांदळवन क्षेत्राच्या संबंधात प्रकल्प यंत्रणेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या नोटीस ऑफ मोशन क्र.३०७/२०१६ मध्ये मा. न्यायालयाने दि.२८.११.२०१६ रोजी पारित केलेल्या निर्णयात घालून दिलेल्या अटी / शर्ती प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

८) जिल्हाधिकारी, रायगड व मुंबई शहर यांनी वनहक्क कायदा, २००६ प्रमाणपत्र जारी केलेले आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक/ पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

९) पर्यावरण व वनमंत्रालयाने वन व वन्यजीव विकास व संवर्धन या दृष्टीने वेळोवेळी घातलेल्या व घालण्यात येणा-या इतर अटी प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

१०) रोडच्या बांधकामाचे प्लॅन नुसार येणारे साकाव / पूल यांचे बांधकाम करताना नैसर्गिक पाण्याचे मार्ग नदी, नाले, पाण्याचे प्रवाह बंद होणार नाहीत. तसेच वन्यप्राणी यांचे जाण्या-येण्याचे मार्ग बंद होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

११) वने / वन्यजीव यांचे संवर्धन करण्याकरीता राज्याच्या मुख्य वन्यजीव रक्षक यांनी काही योजना तयार केल्यास सदर योजनेनुसार प्रकल्प यंत्रणेने तेवढे अनुदान राज्य शासनाकडे वर्ग करुन मदत करण्याची आहे.

१२) प्रकल्पासाठी करण्यात येणा-या खाणीचे पुर्नभरण (Reclamation) करण्याचा प्रश्न उदभवल्यास ते वनविभागाच्या देखरेखीखाली करुन सदर क्षेत्रावर वनीकरण करण्याची कार्यवाही करावी.

१३) प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता वर अ.क्र. ११ मध्ये उपाययोजना सुचविल्यास आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.

१४) वळतेकरण क्षेत्राचे जागेवर ४ फूट उंचीचे पक्के सिमेंट पिर्लस लावून सिमांकीत करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक आहे.

१५) जिल्हाधिकारी रायगड व मुंबई शहर यांचे वनहक्क कायदा २००६ प्रमाणपत्रासोबतचे जे दस्तऐवज प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त झालेले नाहीत. ते दस्तऐवज वनविभागास देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

१६) वनविभागातील वाहनांना टोलमध्ये सुट (exemption) देणेबाबतच्या प्रस्तावाबाबत प्रकल्प यंत्रणेने कार्यवाही करणे जरुरी राहील.

१६) उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) संबंधित उपवनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत दिनांक २५.१०.१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना मधील कलम १.९ नुसार अहवाल सादर करतील.

**<u>अनुसुची</u>**

| गावांचे नांव | तालुका | सर्व्हे नंबर | वैधानिक दर्जा | क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|
| गव्हाण | पनवेल | 24/1P, 24/2, 24/3, 24/4P, 24/5P, 24/6, 24/8, 24/10P, 25/1P, 25/2P, 25/3P, 26/1, 26/2, 26/3, 26/4P, 26/5P, 27/7P, 27/2P, 53/1, 53/2, 53/3, 53/4P, 53/5P, 53/6P, 54/1P, 54/2P, 54/3, 54/5P, 54/6, 54/8P, 55/2P, 55/3P, 55/4, 55/6P, 55/8P, 56/1, 56/2, 56/3, 56/4, 56/5P, 56/6, 57/1, 57/2, 57/3, 57/4, 57/6, 57/7, 57/8, 57/9P, 57/10, 57/11, 57/12, 57/13, 57/14, 57/15, 58/1, 58/2P, 58/3, 58/4, 58/5, 58/6, 58/7, 58/8, 58/9P, 58/10, 59/1P, 59/2P, 59/3P, 59/4P, 59/5, 59/6, 59/7P, 60/1P, 60/3P, 60/4P, 60/6P, 60/8P, 76/6P, 76/7, 76/8, 77/1, 77/2, 77/3P, 77/4P, 77/5, 77/6, 77/7P, 77/8, 77/9, 77/10, 77/11P, 78/1P, 78/3P, 80/2P, 80/3P, 80/4P, 81/1, 81/2P, 81/3P, 127/P, 408/1/1 P, 408/1/2 P, 437/P, 442/P, 444/P, 446/P. | कांदळवन क्षेत्र | 37.2754 |
| गव्हाण | पनवेल | 262/0, 262/0, 391/B. | संरक्षित वन | 1.012 |
| जासई | उरण | 4/D, 4/A | संरक्षित वन | 5.5001 |
| जासई | उरण | 71/A/1A, 71/2A, 71/4, 71/5, 127/3B/B, 127/3B, 127/4A, 127/5, 127/8, 127/9, | खाजगी वने पुनस्थापित | 1.883 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 127/10A, 127/10B | क्षेत्र | |
| चिरले | उरण | 198/0, 199/0, 6/B (कं.नं. 6P) | संरक्षित वन | 0.4465 |
| | | **अलिबाग वनविभाग एकूण क्षेत्र** | | **46.117** |
| शिवरी | कुर्ला | सिटीएस क्र. 865, | कांदळवन क्षेत्र | 1.30 |
| | | **ठाणे वनविभाग एकूण क्षेत्र** | | **1.30** |
| | | **एकूण एकंदर** | | **47.417** |

सदर आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर, सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

**(सुनील लिमये)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**

प्रती,

उप वनसंरक्षक, अलिबाग व ठाणे.

प्रतिलिपी :- सचिव (वने) मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई, SRA इमारत, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) - ४०० ०५१ यांजकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी रायगड व ठाणे यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अलिबाग व ठाणे यांचेकडे माहिती तथा आवश्यक कार्यवाही सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२.००	निर्देशित करण्यात येते की, या संदर्भातील सर्व आदेश सर्व्हे क्र., क्षेत्र आणि वैधानिक दर्जा आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एका स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत. आणि त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे आणि संबंधित उपवनसंरक्षक यांना देण्यात यावी.

३.००	Mitigation measures साठी BNHS संस्थेने कळविले नुसार आधीची रक्कम रु.३३.०० कोटी अथवा याबाबतीत BNHS यासाठी पुर्नप्रस्ताव करीत असल्याने त्यानुार जी रक्कम होईल ती रक्कम प्रकल्प यंत्रणेने शासनाकडे हस्तांतरीत करावी, व त्यानंतर शासनाकडून दरवर्षी आवश्यक ती रक्कम BNHS संस्थेस वर्ग करण्यांत येईल. या अटींच्या अधिन प्रकल्प यंत्रणा राहील, बाबत हमीपत्र प्रकल्प यंत्रणेने सादर करावे.

प्रतिलिपी :- एकरेषिय प्रकल्प निवड नस्ती, वनवृत्त कार्यालय ठाणे.

प्रतिलिपी - कक्षा-११ (तांत्रिक), वनवृत्त कार्यालय ठाणे यांचेकडे वरील आदेश शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी रवाना.

**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.**